REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 1 | OCTOBER - 2021

# "दक्षिण आशियातील दहशतवादाचा भारतीय सुरक्षेवरील प्रभाव"

**Prof. Dr. N. Z. Patil**
Research Guide & HOD In Defence and Strategic Studies,
K.N.B.Art's College Navalnagar, Tal & Dist-Dhule(Maharashtra)

## प्रस्तावना:-



आज जगात झालेल्या विज्ञान आणि तंत्रज्ञाच्या प्रगतीमुळे संपूर्ण मानव जातीच्या जीवनात विकास,सहजता,आर्थिक आणि भौतिक जीवनाने परिपूर्ण बनविले आहे.आजच्या सद्यस्थिती मध्ये मनुष्य विकासाच्या मार्गावर रूढ झालेला आहे.एकीकडे विकास होत असताना मानवी सभ्यते पुढे एक असभ्य लोकांची संस्कृती देखील दहशतवादाच्या रूपाने उदयास येऊन त्याचे धोके देखील तेवढेच वाढत आहेत.मानवी जीवनाला जर आपल्याला समृद्ध संपन्न, शांतीपूर्ण आणि सुरक्षित ठेवायचे असेल तर,आपल्याला अश्या आव्हानांचा सामना हा करावाच लागणार आहे.जगात जे काही धोके आज निर्माण झाले आहे त्या धोक्यान मध्ये लष्करी आणि बिन लष्करी असे दोन्ही प्रकारचे धोके आहेत, परंतु यात सर्वाधिक जे धोके आहेत त्यात इस्लामिक दहशतवाद हा सर्वात जास्त मोठा धोका आहे.

दहशत /आतंक या शब्दाची उत्पत्तीचा जर आपण विचार केला तर तो शब्द फ्रान्स तसेच लेटीन भाषेतून आलेला आहे. माराठीत त्याचा अर्थ होतो घाबरवने त्यालाच दहशत निर्माण करणे असे ही म्हटले जाते.आज जगातील अनेक देश्यान मध्ये चांगला दहशतवाद आणि वाईट दहशतवाद असा भेद केला जाऊ लागला आहे.वास्तविक एका देशासाठी जो दहशतवाद चांगला असतो तो दुसऱ्या देश्या साठी वाईट असतो म्हणून चांगला आणि वाईट असा त्या बाबत भेद करणे ही दुर्दैवी बाब आहे.आज दहशत वादाचा जो जगात विस्तार होत आहे ते पाहता संपूर्ण जग आज दहशतवादाच्या प्रभावा खाली आलेले आहे. दक्षिण आशियाचा जर विचार केला तर त्यात भारत हा दहशतवादाचा सर्वात जास्त बळी ठरलेला आहे.

## दहशतवादाचे स्वरूप :-

दहशतवादा बद्दल आणि त्याच्या परिभाषे विषयी वेगवेगळ्या विचारवंतानी वेगवेगळे विचार आपल्या विविध प्रकारच्या व्याख्यान मधून मांडले आहेत.बेन.एम. जेन्कीत्स-यांच्या विचार नुसार , "दहशतवाद हिंसे च्या उपयोगा बबतची धमकी आहे,लोकांचे हिंसात्मक कार्य आहे,ज्याचा प्रचार प्रचर करून लोकांमध्ये दहशत निर्माण करणे हा आहे".

जी.शोत्झर्ण बर्जर :- यांच्या मतानुसार दहशतवादा अंतर्गत दहशतवाद म्हणजे शक्तीचा प्रयोग भयाला उत्पन्न करणे यासाठी केला जातो आणि त्यांच्या द्वारा असा उद्देश प्राप्त करून घेतला घेतला जातो की, जो त्यांच्या मस्तिषका मध्ये

असतो. समाज शास्त्र विश्वकोशात दहशतवादाची व्याख्या करताना असे म्हटले गेले आहे की, दहशतवाद एक अशा पद्धतीचा प्रचार आहे की, ज्या द्वारा काही संघटित समूह किंवा दल आपल्या उद्देशयांच्या प्राप्तीसाठी हिंसेचा योजनाबद्ध पद्धतीने उपयोग करतात. encyclopeadia ब्रिटानिका या ग्रंथानुसार दहशतवाद राजनीतिक उद्देशाच्या प्राप्तीसाठी सरकार, जनता किंवा व्यक्तींच्या विरुद्ध भय किंवा हिंसेचा व्यवस्थित उपयोग म्हणजे दहशतवाद होय असे म्हटले आहे. पाल विल्किन्सन यांनी दहशतवादा बद्दल असे म्हटले आहे की, दहशतीच्या माध्यमातून लोकांना त्रास देणे तसेच त्यांचे म्हणणे आहे की, दहशतवादी आपल्या राजनीतिक मागण्यांना मान्य करून घेण्यासाठी व्यक्तिगत, समूह, जातिविशेष किंवा सरकार विशेष यांना हरवून किंवा क्रमबद्ध पणे त्यांचा विनाश अथवा हिंसेचे भय दाखवून त्यांना ते मानण्यास भाग पाडले जाते. वरील सर्व प्रकारच्या व्याख्याचा अभ्यास केल्यावर असे लक्षात येते की दहशतवादाचा एक सर्वसाधारण असा अर्थ निघतो की काही व्यक्तिगत किंवा सामूहिक गट आपल्या ,राजनीतिक उद्देशा च्या पूर्तीसाठी हिंसेचा किंवा भयाचा बेकायदेशीर उपयोग करण्याचा प्रयत्न करतात.

वास्तविक दहशतवाद हा कोणत्या तरी विदेशी समूह किंवा संघटने द्वारा चालवला जातो. अशा प्रकारच्या दहशतवादास आम्ही विदेशी दहशतवाद किंवा सीमापार प्रायोजित दहशतवादाची सज्ञा देतो. दहशतवादाचे नियोजन किंवा त्याची कार्यवाही त्याच देशांमध्ये केली जाते अशा देशालाच दहशतवादी देश असे म्हटले जाते. दहशतवाद्यांची पद्दत् हिंसक तसेच विनाशकारी प्रवृत्तीची असल्या कारणामुळे सर्व प्रकारचा दहशतवाद समाजात शांती व्यवस्थेला, सामाजिक सद्भावनेला तसेच प्रगतीच्या मार्गामध्ये बाधा निर्माण करत असतो. अश्या दहशतवादामुळे मानव जात आणि त्याचे अस्तित्व किंवा मानवाची सभ्यता या पुढे एक मोठा धोका निर्माण झालेला आहे. दहशतवादाच्या अलीकडील घडणाऱ्या घटनाक्रमाला पाहिल्यास असे स्पष्ट होते की, दहशतवाद्यांचा कोणताही धर्म असत नाही, परंतु काही व्यक्ती आणि काही देश विशेष प्रकारच्या दहशतवादाला धर्म विशेष (इस्लाम) बरोबर जोडण्याची भाषा करतात परंतु ते न्यायोचित नाही. कारण जगातला कोणताही धर्म किंवा धर्मग्रंथ कोणत्याही निर्दोष व्यक्तीची हत्या करण्यासाठी किंवा एखाद्या व्यक्ती समूहाला भयभीत करण्यासाठी किंवा एखाद्याची संपत्ती नष्ट करण्याचा अधिकार देत नाही. दहशतवादाने लाभ मिळवणारे लोक समाजातील नव युवकांमध्ये त्यांना भ्रमित किंवा त्यांचा ब्रेन वॉश करून इस्लाम धर्माची कट्टरता त्यांना शिकवली जाते दुसऱ्या धर्माबद्दल चुकीच्या गोष्टी अशा युवकांच्या डोक्यात भरल्या जातात आणि दहशतवादासाठी प्रेरित केले जाते.

दक्षिण आशियात सन 2007 च्या आधी अशा राष्ट्रांना दक्षिण आशियाई राष्ट्र म्हणून सामील केले गेले होते. ज्यात भारत, पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका, तसेच मालदीव यासारख्या देशांचा समावेश दक्षिण आशियाई देशांमध्ये केला जात होता. सार्क संघटनेचे चौदावे शिखर संमेलन तीन आणि चार एप्रिल 2007 मध्ये नवी दिल्ली येथे घेतले गेले आणि त्या संमेलनात अफगाणिस्थानला सार्कचे आठवे सदस्य राष्ट्र म्हणून सन्मानित केले गेले. सद्यपरिस्थितीत आशियातील या आठही देशांमध्ये दहशतवादाने आपला उत्पाद मांडलेला आहे. अशा या दक्षिण आशियातील दहशतवादाने पीडित सर्व राष्ट्रांचा आपणास पुढील प्रमाणे आढावा घेता येईल.

### भारत:-

तसे पाहिले तर भारत हा 1947 मध्ये जसा स्वतंत्र झाला तसाच भारताला दहशतवादाने ग्रसित केलेले आपल्याला दिसून येते. खऱ्या अर्थाने भारतातील दहशतवाद हा पाकिस्तान प्रेरित आणि पाकिस्तान प्रायोजितच आहे. पाकिस्तानातील कबाली आणि पठाण लोकांनी जम्मू आणि काश्मीर मध्ये हल्ले केले पाकिस्तानची ही हरकत खऱ्या अर्थाने बेकायदा पूर्ण होती. 1980 च्या दशकात पंजाब मध्ये तीव्र स्वरूपाचा असंतोष निर्माण झाला होता.

**दहशतवाद्यांनी सर्वत्र दहशत पसरवली, 1990 च्या दशकात पुन्हा जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया वाढल्या, उत्तर भारत, बिहार, ओडिसा, आंध्र प्रदेश, केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र या राज्यांमध्ये देखील दहशतवादाने आपले पाय पसरवण्यास सुरुवात केली. भारताचा उत्तर पूर्वेतील भाग ज्याला आपण सप्त भगिनी प्रदेश किंवा सेवन सिस्टर झोन म्हणून ओळखतो त्यात देखील दहशतवाद आणि बंडखोरी, भाषावाद यासारख्या समस्यांनी हा प्रदेश देखील ग्रसित झाला. एकविसाव्या शतकात सन 2001 मध्ये भारतीय संसदेवर दहशतवादाने हल्ला केला, सन 2008 मध्ये मुंबईतील हॉटेल ताज, नरिमन पॉइंट इत्यादी ठिकाणी दहशतवादी हल्ला झाला तर वर्तमानात 2 जानेवारी 2016 रोजी पठाणकोट येथे असलेल्या भारतीय वायुसेनेच्या एयर बेस वर दहशतवाद्यांनी हल्ला केला त्यानंतर पुलवामा येथे जवळजवळ 42 जवान दहशतवादाला बळी पडलेले आपल्याला दिसून येतात. या सर्व घटनाक्रमाला पाहिले तर असे लक्षात येते की आशियातील दहशतवादाला बळी ठरणारा भारत हा एक मोठा देश आहे आणि भारताला अशा प्रकारच्या घटनांचा वारंवार सामना करावा लागत आहे.**

## भारतातील सक्रिय दहशतवादी संघटना:-

**भारतातील सक्रिय दहशतवादी संघटना बद्दल अभ्यास केला तर असे दिसून येते की भारतात पाकिस्तान समर्थित जवळजवळ 50 पेक्षा अधिक दहशतवादी संघटना कार्यरत आहेत या. दहशतवादी संघटना मध्ये जैश-मोहम्मद, अल-बदर-मुजाहिद्दीन, लष्कर-ए-तोयबा, जमात-ए-इस्लामी, उमर मुजाहिदीन, हिजबुल मुजाहिदीन, तहरीक ए मुजाहिदीन, हरकत उल अंसार, जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट, अल जिहाद, , तारिक - ए- जेहाद, हरकत- ए- जहात याबरोबरच ईशान्य भारतात देखील वेगवेगळ्या प्रकारच्या बंडखोर आणि उग्रवादी संघटनांचा उदय झालेला आहे. अशा या सर्व संघटनांच्या दहशतवादी कारवायांमुळे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा पुढे एक प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. दहशतवादाला निपटून काढण्यासाठी भारताने दहशतवादाच्या संघटनांचे अनेकदा वेगवेगळ्या पातळींवर चर्चा करून देखील किंवा आपल्या शेजारी राष्ट्रांशी चर्चा करून देखील या कारवायांवर काहीही फरक पडताना दिसून येत नाही.**

## भारतातील दहशतवादी घटना आणि त्यात झालेले मृत्यू:-

| वर्ष | नागरिक | सुरक्षाबल | दहशतवादी | एकूण |
|---|---|---|---|---|
| २००१ | ८०० | ६३८ | १८०८... | ३२८८ |
| २००२ | ८३९ | ४८९ | १७१४ | ३०२२ |
| २००३ | ६५८ | ३३८ | १५४६ | २५४२ |
| २००४ | ५३४ | ३२५ | २५१ | १८१० |
| २००५ | ५२१ | २१८ | १००० | १७३९ |
| २००६ | ३४९ | १६८ | ५९९ | ११६ |
| २००७ | १६४ | १२१ | ४९२ | ७७७ |
| २००८ | ६९ | ९० | ३८२ | ५४१ |
| २००९ | ५५ | ७८ | २४२ | ३७५ |
| २०१० | ३६ | ६९ | २७० | ३७५ |
| २०११ | ३४ | ३० | ११९ | १८१ |
| २०१२ | १६ | १७ | ८४ | ११७ |
| २०१३ | २० | ६१ | १०० | १८१ |
| २०१४ | ३२ | ५१ | ११० | १९३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२०१५** | **२०** | **४१** | **११३** | **१७४** |
| **२०१६** | **००** | **०७** | **०६** | **१३** |

**वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, २०१२ नंतर भारतातील दहशतवादी घटनांमध्ये सतत कमी होताना दिसून येत आहे मोदी सरकारच्या काळात दहशतवादी घटनांमध्ये आणि होणाऱ्या मृत्यूंमध्ये बरचसा बदल प्रकर्षाने जनवताना दिसून येतो.**

## पाकिस्तान:-

**पाकिस्तानची निर्मिती** 1947 **मध्ये झाली आणि तेव्हापासूनच पाकिस्तान आपल्या वाईट उद्देशाने प्रेरित होऊन त्या उद्देशाच्या पूर्तीसाठी पाकिस्तानने दहशतवादा सारख्या गोष्टींमध्ये आपला सहभाग सुरू केला आणि तेव्हापासूनच त्यांनी दहशतवादाच्या माध्यमातून जम्मू काश्मीर मधील लोकांना भडकावण्याचा प्रयत्न चालवलेला आहे. पाकिस्तान त्याच्या निर्मितीपासूनच भारतविरोधी कारवायांमध्ये लिप्त झालेला आहे. सुरुवातीपासूनच पाकिस्तान भारतविरोधी कारवायांमध्ये लिप्त आहे एवढेच नाही, तर भारत विरोधी दहशतवादाचा उपयोग करून भारताची व्यवस्था आणि त्या व्यवस्थेमध्ये व्यवधान आणण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी दहशतवाद्यांना पैसा, शस्त्रास्त्रे आणि प्रशिक्षण यासारख्या गोष्टी पुरवत आहे. पाकिस्तान हे विसरून जातो की, जो दुसरया साठी खड्डे खोद्तो तो स्वत: त्या खड्ड्यात पडतो. वास्तविक वर्तमानात जर आपण विचार केला तर पाकिस्तान देखील दहशतवादाचा प्रभावित आहे.** 2014 **मध्ये पेशावर मधील एका सैनिकी स्कूल वर हल्ला केला गेला होता त्यात जवळजवळ** 148 **शाळकरी विद्यार्थ्यांसह नागरिकांचा बळी गेला होता, त्याच प्रमाणे सप्टेंबर** 2015 **मध्ये एका हवाई तळावर बॉम्ब स्पोट झाला त्यात सुद्धा पाकिस्तानचे बरेच नुकसान झाले पाकिस्तानची एकूण राजकीय परिस्थिती, आहे सैनिकी परिस्थिती आहे, किंवा मनोवैज्ञानिक परिस्थिती आहे त्या परिस्थितीमुळे पाकिस्तान दहशतवादाच्या विरुद्ध कोणत्याही प्रकारची कठोर कारवाई करू शकत नाही हे सत्य आहे**

### पाकीस्तानात दहशतवादी घटनांमध्ये झालेले मृत्यू

| वर्ष | नागरिक | सुरक्षा दल | दहशतवादी | एकूण |
|---|---|---|---|---|
| २००३ | १४० | २४ | २५ | १८९ |
| २००४ | ४३५ | १८४ | २४४ | ८६३ |
| २००५ | ४३० | ८१ | १३७ | ६४८ |
| २००६ | ६०८ | ३२५ | ५३८ | १४७१ |
| २००७ | १५२२ | ५९७ | १४७९ | ३५९८ |
| २००८ | २१५५ | ६५४ | ३९०६ | ६७१५ |
| २००९ | २३२४ | ९९१ | ८३ ८९ | ११७०४ |
| २०१० | १७६५ | ४६९ | ५१७० | ७४३५ |
| २०११ | २७३८ | ८६५ | २८०० | ६३०३ |
| २०१२ | ३००७ | ७३२ | २४७२ | ६२११ |
| २०१३ | ३००१ | ६७६ | १७०२ | ५३७९ |
| २०१४ | १७८१ | ५३३ | ३१८२ | ५४९६ |
| २०१५ | ९४० | ३३९ | २४०३ | ३६८२ |
| २०१६ | ०० | ०० | ०२ | ०२ |

## अफगाणिस्थान:-

**सामरिक दृष्टिकोनातून अफगाणिस्थान अशा ठिकाणी स्थित आहे जे, दक्षिण आशिया साठीच नाही तर संपूर्ण जगातील महाशक्तींना देखील तो एक आकर्षणाचा बिंदू आहे.** 2012 **मध्ये अफगाणिस्थान ची लोकसंख्या जवळ जवळ तेहतीस पॉईंट झिरो चार कोटी एवढी होती. अफगाणिस्तानचे भौगोलिक क्षेत्रफळ सहा लाख** 52 **हजार** 250 **वर्ग**

**किलोमीटर तसेच अफगाणिस्थान हा आपल्या भविष्यासाठी आणि आपल्या विकासासाठी सतत दहशतवाद्यांन बरोबर लढत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाने अफगाणिस्थान मध्ये आपली रुची दाखवली एवढेच नाही, तर सन** 1978 79 **मध्ये रशियाने अफगाणिस्तानातील अस्थिरतेचा फायदा उठवत अफगाणिस्तानात सशस्त्र आक्रमण केले, एवढेच नाही तर रशियाने लादलेले हे युद्ध सतत दहा वर्षे चालले आणि अफगाणिस्थान दहा वर्षापर्यंत सतत रशियाच्या आक्रमणाच्या आगीत होरपळत राहिला. अफगाणिस्तानातील अंतर्गत अस्थिरता तसेच धार्मिक जिहादी कट्टरता याचा सोवियेत संघाच्या विरुद्ध उपयोग केलेला होता आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी किंवा व्यक्तिगत स्वार्थ पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानने देखील अमेरिकेला पूर्णपणे मदत केली होती. सन** 1994 **मध्ये तालिबानचा उदय झाला अफगाणिस्थान साठी तालिबानची निर्मिती एक दुर्दैवी घटना म्हणता येईल.** 1998 **मध्ये अल कायदा या दहशतवादी संघटनेचे निर्मिती झाली अमेरिका मध्ये** 9/11 **दहशतवादी घटना घडल्यानंतर तालिबान प्रमुख ओसामा बिन लादेन हा अफगाणिस्तानात असल्याची अमेरिकेला माहिती मिळाली. अमेरिकेने त्याला मारण्यासाठी तसेच नाईन इलेव्हन चा बदला घेण्यासाठी अफगाणिस्तानात एक अनिश्चित कालीन युद्धाची सुरुवात केली त्यामुळे अफगाणिस्तानात आर्थिक, राजकीय, सामाजिक, बेरोजगारी तसेच इतर दहशतवादी घटनांनी ग्रस्त झाला. वर्तमानात आशिया, सीरिया, लेबनान, इराण, इराक, अरब राष्ट्र, युरोपातील देश ,अमेरिका, अफगानिस्तान इत्यादी देशांमध्ये( इस्लामिक स्टेट ऑफ इराक) नावाच्या सर्वात वाईट दहशतवादी संघटन व त्याच्या हालचाली मुळे जगातील हे देश पूर्णपणे त्रस्त आहेत. आणि असमंजस परीस्थितीत आहेत.**

## श्रीलंका:-

**दक्षिण आशियात श्रीलंका हे हिंदी महासागरात स्थित असल्याकारणाने श्रीलंकेची सामरिक स्थिती ही इतर देशांच्या तुलनेत थोडी वेगळी असलेले आपल्याला दिसून येते तेवढेच नाही तर श्रीलंकेची सुरक्षा समस्या देखील त्याच्या वैविध्यपूर्ण स्थानामुळे थोडी कठीण आहे असे आपल्याला म्हणता येईल. श्रीलंकेचे भौगोलिक क्षेत्र जवळजवळ पंचवीस हजार** 332 **वर्ग किलोमीटर तसेच श्रीलंकेची लोकसंख्या** 1202 **मिलियन एवढे आहे.श्रीलंका देखील** 1948 **मध्ये म्हणजेच भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर श्रीलंकेला स्वातंत्र्य मिळालेल दिसून येते त्यानंतर श्रीलंकेत अंतर्गत संघर्षा ची समस्या आहे ती समस्या गेल्या अनेक वर्ष पासून सुरू असलेले आपल्याला दिसून येते. सिंहली आणि तामिळ यांच्या मिळून श्रीलंकेची जी एकूण लोकसंख्या आहे त्यात सिंहलींचे प्रमाण** 74 **टक्के तर तामिळ यांचे प्रमाण हे** 13 **टक्के असलेले आपल्याला दिसून येते सहा टक्के काही इतर धर्मीयांचा त्याठिकाणी प्राबल्य असलेले दिसून येते. सन** 1977 **नंतर श्रीलंकेतील सिंहली आणि तामिळ यांच्यातील गृहयुद्धाने एक विक्राळ रूप धारण केलेले होते त्यातूनच श्रीलंकेत वेगवेगळ्या दहशतवादी गटांची निर्मिती झाली. त्यात( तामिळ युनायटेड लिबरेशन फ्रंट, लिब्रेशन टायगर ऑफ तामिळ इलम, पीपल्स रीहोलूशनरी फ्रंट, तमिल इलम आर्मी, तमिल इलम लिबरेशन आर्मी, तमिल इलम रिव्होल्युशनरी ऑर्गनायझेशन, नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ तमिल इलम, तमिल डिफेन्स फ्रंट यासारख्या अनेक दहशतवादी संघटनांची श्रीलंकेत निर्मिती झालेली आपल्याला दिसते या संघटनांनी सर्वात आधी मानवी बॉम्बचा प्रयोग करायला सुरुवात केली. श्रीलंके बरोबरच या संघटनान मुळे भारताला देखील खूप मोठी हानी सहन करावी लागलेली आहे. मे** 2009 **एल टी टी प्रमुख वेल पिल्ली प्रभाकरण याच्या मृत्यूनंतरश्रीलंकेत जवळजवळ शांती कायम राहण्याची आशा केली जाऊ लागली आणि कालांतराने ती गोष्ट खरी ठरलेली दिसून येत आहे. प्रभाकर यांच्या मृत्यूनंतरश्रीलंकेत खऱ्या अर्थाने वांशिक संघर्ष जवळ जवळ संपल्यात जमा झालेला आहे.**

## नेपाळ:-

नेपाळ हे हिमालयाच्या कुशीत स्थिरावलेले एक छोटेसे राष्ट्र आहे. हे सन 1950 पासून चीनने तिबेटवर आपला अधिकार प्राप्त केल्यानंतर भारत आणि चीन यांच्यामध्ये एक बफर स्टेट म्हणून आपण ज्याला ओळखतो ते म्हणजे नेपाळ आणि तेव्हापासून नेपाळ हे बफर स्टेट म्हणून आपली भूमिका निभावत आलेले आहे. सन 1950 मध्ये नेपाळमध्ये गृहयुद्धाची सुरुवात झाली होती तेव्हा नेपाळचे राजे महाराजा त्रिभुवन यांनी आपल्या परिवारासह भारतात आश्रय घेतला होता. जून 2001 मध्ये नेपाळ नरेश ज्ञानेन्द्र याने आपला भाऊ राजा वीरेंद्र आणि त्याच्या पूर्ण परिवाराची हत्या केली होती. याच्या आधी नेपाळमध्ये माओवाद्यांन द्वारे देखील गृहयुद्ध प्रारंभ झाले होते. 21 नोव्हेंबर 2006 रोजी माओवाद्यांनी आपला सशस्त्र संघर्ष समाप्त केला.तेव्हा सात राजकीय पक्षांनी नेपाळ मध्ये आपले अंतरिम सरकार स्थापन केले त्यावेळेला नेपाळमधील माओवाद्यांनी देखील एका शांती करारावर हस्ताक्षर केले. त्यानंतर एप्रिल 2008 मध्ये नेपाळ मध्ये संविधान निर्माण झाले आणि नव्या संविधानानुसार त्या ठिकाणी निवडणुका घेण्यात आल्या पहिल्या निवडणुकीत पुष्प कमल दहल हे प्रचंड बहुमताने नेपाळच्या सत्तेवर आरूढ झाले आणि ते माओवाद्यांचे प्रतिनिधी होते. सन 2015 मध्ये नेपाळमध्ये काही राजनीतिक आणि जातीवादी दलांनी आपल्या व्यक्तिगत फायद्यासाठी तेथील मुळनेपाली यांना आपल्या अधिकरापासून आणि सेवा पासून वंचित केले होते. नेपाळमध्ये मधेशी भारतीय वंशाचे लोक राहतात ते देखील त्या ठिकाणी सतत विद्रोह, आगी लावणे, संप पुकारणे यासारख्या गोष्टी नेपाळमध्ये अधून मधून करत असताना दिसून येतात.

कोणत्याही देशामध्ये किंवा कोणत्याही देशातील संविधानानुसार त्या देशात निवास करणाऱ्या कोणत्याही एखाद्या पक्षाला बेदखल करणे म्हणजे त्या देशांमध्ये एक प्रकारे अराजक्ता आणि अस्थिरता निर्माण करण्यासारखे असते किंवा त्याचे एक सूचक असते आणि म्हणूनच नेपाळमध्ये अशा प्रकारचे सध्याचे राजकारण आहे की, काही विशिष्ट गट काही विशिष्ट गटांना राजकारणापासून बेदखल करण्याचा, एवढेच नाही तर काही विशिष्ट गटांवर त्या ठिकाणी अन्याय अत्याचार होताना दिसतात आणि म्हणून या सगळ्या गोष्टी नेपाळला अस्थिर करण्याची एक प्रकार आहे. असे वरील घटनाक्रमावरून आपल्याला दिसून येते.

### भूतान:-

भूतान हे देखील हिमालयाच्या कुशीमध्ये वसलेले एक छोटेसे आणि स्वतंत्र असे राष्ट्र आहे ज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ हे अठरा हजार वर्ग मधील एवढे असून तेथील लोकसंख्या जवळजवळ 2012 मध्ये सातशे आठ लाख एवढी आहे. साधारणपणे भुतानी लोकांचा धर्म हा बौद्ध धर्म असून भूतान चा संपूर्ण इतिहास हा शांतीपूर्ण असलेला दिसून येतो. त्याचे काही कारणे देखील आहेत. भुतान मध्ये सण 2008 मध्ये काही दहशतवादी घटनादेखील आणि काही बॉम्ब स्पोट देखील घडले तरीदेखील भूतानमध्ये शांतता कायम टिकून असल्याचे दिसून येते. भूतान मध्ये सन 2004 पासून तर 2016 पर्यंत फक्त तेरा दहशतवादी घटना घडलेल्या दिसतात. आणि त्यात आठ लोक मारले गेले त्यात काही दहशतवादी देखील होते. नेपाळचे सर्वसाधारणपणे आपल्या सर्व शेजारी राष्ट्रांशी चीन वगळता सर्वांशी सलोख्याचे संबंध असलेले दिसून येतात. नेपाळ संरक्षणात्मक दृष्ट्या भारतावर जास्त अवलंबून असलेला दिसून येतो. भारत देखील आपला शेजारधर्म म्हणून नेहमीच भुतान च्या पाठीशी उभा आहे. कुठल्याही प्रकारचे संकट असो भारत भूतानला सतत मदत करत आलेला आहे. केंद्रामध्ये लोकशाही आघाडीचे सरकार आल्यानंतर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भुतांचा दौरा करून व भुतांच्या पंतप्रधानांनी भारताच्या दौरा करून संबंधांमध्ये अजूनच एक वेगळेपण निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नरेंद्र मोदी सरकारने भूतानला मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत देखील केलेले आहे. एवढेच नाही तर विविध क्षेत्रात भूतान चा विकास व्हावा म्हणून भारतीय तज्ञ वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये त्या ठिकाणी कार्यरत आहेत. याबरोबरच भारत भूतान ला

**सुरक्षा सुद्धा मोठ्या प्रमाणावर पुरवत आलेला आहे. भारताचे इतर कोणत्याही शेजारी राष्ट्रांपेक्षा भूतान बरोबर मित्रत्वाचे संबंध असलेले आपल्याला सद्यस्थितीत दिसून येतात. सामरिक दृष्टीने देखील भूतांचे एक वेगळे महत्त्व आहे जर भारतासारखा बलाढ्य देश भुतान च्या पाठीमागे उभा राहिला नाही. तर चीन सारखा विस्तारवादी देश कधी भूतान वर आपले वर्चस्व निर्माण करेल हे सांगता येणार नाही. म्हणून भारताला भूतान बरोबर ची मैत्री आणि भुतान ला भारताबरोबर ची मैत्री या दोन्ही गोष्टी एकमेकाला पूरक असलेल्या दिसतात आणि त्या म्हणजे विशेषतः सुरक्षा कारणाने देखील या मैत्रीला अधिक महत्त्व असलेले आपल्याला दिसून येते.**

## बांगलादेश:-

**खरे म्हणजे बांगलादेशाचा उदय ज्या कठीण परिस्थितीतून झाला. तो काळ म्हणजे बांगलादेशच्या दृष्टिकोनातून भयानक असा काळ होता. बांगलादेशाची निर्मिती ही भारतीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना होती. कदाचित या पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान यांच्यात झालेल्या गृहयुद्धात जर भारताने हस्तक्षेप केला नसता तर कदाचित पाकिस्तानची स्थिती आज कशी राहिली असती याबाबत सुद्धा आपल्याला स्पष्टपणे काही सांगता येणार नाही. भारताच्या खंबीर धोरणाने खंबीर हस्तक्षेपाने बांगलादेशची निर्मिती** 16 **डिसेंबर** 1971 **मध्ये झालेले आपल्याला दिसते. क्षेत्रफळाच्या दृष्टीने बांगला देशाचे क्षेत्रफळ जवळजवळ एक लाख** 44 **हजार चौरस किलोमीटर एवढे आहे. बांगलादेशात साधारणपणे बांगला भाषा बोलली जाते. दुर्दैवाने बांगला देश देखील आज आपल्याला पाकिस्तानच्या पावलावर पाऊल ठेवून चालताना दिसून येत आहे. ज्या प्रकारचा मूलतत्त्ववाद पाकिस्तानात बनवलेला आहे किंबहुना तशी स्थिती आज बांगलादेशात देखील निर्माण होताना दिसत आहे. म्हणूनच बांगलादेशात सुद्धा अश्या मूलतत्त्ववादी (हरकत-उल-जिहाद, अल इस्लामी बांगलादेश, जमात- उल- मुजाहिदीन बांगलादेश, हिजबुल - तहरीर, जमात ची शाखा आय सी एस यासारख्या अनेक दहशतवादी संघटनांकडून अधून-मधून बांगलादेशात दहशत वादी कारवायांना घडवून आणले जाते सन** 2013 **मध्ये** 379 **लोकांच्या मृत्यू या इस्लामी कट्टरपंथी यांनी बांगलादेशामध्ये घडवून आणलेला दिसतो. पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे शिबिरे देखील बांगलादेशामध्ये चालवले जातात त्यात प्रशिक्षण घेतलेले दहशतवादी बांगलादेश मार्गे भारतात प्रवेश करतात आणि भारतात घातपात घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. बांगलादेशच्या जमीनी चा उपयोग पाकिस्तानी दहशतवादी भारत विरोधी कारवायांसाठी अलीकडे करताना दिसून येत आहेत.** 27 **नोव्हेंबर** 2015 **रोजी मेरट परिसरात एका दहशतवाद्याला अटक केली गेली. त्यातून ही गोष्ट उघड झाली. तो दहशतवादी आय एस आय चा एजंट मोहम्मद एजाज याने देखील बांगलादेश मार्गे भारतात प्रवेश केला होता.**

**भारताच्या उत्तर पूर्वेतील प्रदेशांमध्ये सुरु असलेला विप्लव, बंडखोरी किंवा तेथील जोक उग्रवादी गटांना पाकिस्तानकडून प्रशिक्षण, शस्त्रास्त्रे आणि पैसा पुरवला जातो आणि त्यातून भारत विरोधी कारवाया घडवून आणल्या जात आहेत. या सगळ्या गोष्टी किंवा घटना बांगलादेश चा उपयोग करून होताना दिसतात त्यामुळे अशा प्रकारच्या घटना घडणे हे भारतासाठी तर वाईट आहेच पण त्याच प्रमाणे ते बांगलादेशाच्या दृष्टिकोनातून देखील वाईट आहे. बांगलादेशात आधीच कुपोषणा सारख्या बेरोजगारी सारख्या अशा अनेक समस्या आहेत. कुपोषणाच्या जागतिक क्रमवारीमध्ये बांगलादेश** 148 **राष्ट्रांच्या सुचित** 132 **व्या स्थानावर आहे. त्याचप्रमाणे** 177 **देशांच्या भ्रष्टाचाराच्या सुचित बांगलादेशाचे** 116 **वे स्थान आहे आणि अशा या गोष्टी बांगलादेशच्या दृष्टीने खूप वाईट आहे .बांगलादेशातील दहशतवाद आणि त्या दहशद वादात ला बळी पडलेल्या लोकांचा मृत्यूआपल्याला पुढील ताकत्याच्या साह्याने समजून घेता येईल.**

**बांगलादेशात दहशतवादी घटनान मध्ये झालेले मृत्यू:**

| वर्ष | नागरीकांचा झालेला मृत्यू | सुरक्षा दल झालेला मृत्यू | दहशतवाद यांचा झालेला मृत्यू | एकूण मृत्यू |
|---|---|---|---|---|
| २००५ | २०६३ | ९२० | ३३११ | ६२०४ |
| २००६ | २८०३ | १७२५ | ४५०४ | ९०३२ |
| २००७ | १८२८ | १५०४ | ६१४५ | १०७७७ |
| २००८ | ३६५२ | २३४२ | १४६३० | २०६२४ |
| २००९ | १४१९६ | २२७८ | १२७०३ | २९६३७ |
| २०१० | २५७१ | ८४४ | ६०१६ | ९४३१ |
| २०११ | ३१७३ | ९६२ | ३२८४ | ७४१९ |
| २०१२ | ३२७० | ८७१ | २९०२ | ७०४३ |
| २०१३ | ३५३६ | ८८७ | २२४४ | ६६६७ |
| २०१४ | २२१७ | ७०३ | ३६३१ | ६५५१ |
| २०१५ | ११३० | ४९६ | २८३७ | ४४६३ |
| २०१६ | ००१ | ००७ | ००१० | १८ |
| Total | ४१७४० | १३,९९९ | ६२२१७ | ११७९५६ |

**मालदीव:-**

**जो एखादा देश दहशतवादाने पिडीत असेल आणि त्या देशाचा शासक आपल्या राष्ट्रातील अंतर्गत सुरक्षेसाठी जे घटक बाधक असतील त्यांच्या बाबत जर कठोर कारवाई करत नसेल किंवा दहशतवाद्यांना दंडित करत नसेल तर असा शासक आपल्या देशाचे भविष्य पूर्णपणे अंधारमय करतो. यासाठी जो घटक आपल्या करिता समस्या निर्माण करतो किंवा आपल्या शेजारी राष्ट्रांमध्ये देखील जर एखादा सक्रिय गट दहशतवादी कारणांमध्ये सहभागी असेल तर अशा घटकांविषयी माहिती आपल्या शेजारी यास दिली पाहिजे.**

**महाभारतात असे म्हटले आहे की, जो शासक आपल्या राष्ट्रातील राष्ट्र विघातक तत्त्वांना त्या राष्ट्रातून बाहेर करत नाही ही तर, अशा तत्व त्या राष्ट्राच्या शासक आलाच नष्ट करतात.**

**चाणक्य नीती असे म्हणते की, एखादा दृष्ट किंवा पापी व्यक्तीला मारल्याने अनेक लोकांचे कल्याण होत असेल तसे लवकर केले पाहिजे. एखादा आततायी आपल्यालाच मारण्यासाठी येत असेल तर अशा व्यक्तीला मारण्यासाठी कुठल्याही प्रकारचा विचार न करता त्याला लवकरात लवकर मारले पाहिजे असे चाणक्यांनी म्हटलेले आहे.**

**आज आपण भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या संदर्भात विचार केला तर भारताला अंतर्गत तसेच पाहिजे असे अनेक प्रकारचे धोके आज निर्माण झालेले आहेत. असे हे दोघे निवारण्यासाठी राष्ट्रातील प्रत्येक घटकाची नैतिक जबाबदारी आहे. केवळ सरकार आणि सरकारवर अवलंबून राहून प्रत्येक गोष्टीसाठी आपण सरकारला जबाबदार धरणे हे योग्य ठरणार नाही. कारण सरकार प्रत्येक व्यक्तीला व्यक्तीच्या सुरक्षा कधी पुरवू शकत नाही. आणि म्हणून प्रत्येक व्यक्तीने सतर्क होऊन ज्या घटकांमार्फत आपल्या देशविरोधी गोष्टी घडत असतील, तर अशा बाबतची माहिती जर आपल्याला असेल तर त्याबाबत योग्य वेळी योग्य यंत्रणेकडे पोहोचवणे हे प्रत्येकाचे काम आहे. बऱ्याच छोट्या छोट्या व्यक्तिगत स्वार्थासाठी लोक आपल्याच राष्ट्रातील अनेक प्रकारचे गुपिते ही शत्रूला विकतात आणि त्याच्यातून आपल्या देशाचे नुकसान करून घेतात देशाचे नुकसान पर्यायाने आपले व्यक्तिगत नुकसान असते.म्हणून अशा या गोष्टींपासून प्रत्येकाने सावध होऊन वेळीच या गोष्टींवर आळा घालण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे तरच आपल्या देशाची अंतर्गत सुरक्षा ही आपल्याला राहता येऊ शकेल.**

**संदर्भ ग्रंथ**

1) **क्रॉनिकल**, **ऑगस्ट** 2002 **पेज**- 14

2) **लल्लन जी सिंह, राष्ट्रीय रक्षा और सुरक्षा: बरेली बुक डेपो पेज नंबर**- 55

3) **विल्किन्सन पाल**, "**पॉलिटिकल टेररिझम लंडन** 1974 **पेज नंबर**- 18,19

4) **डॉ. राम गोपाल सिंह**" **जिहादी आतंकवाद**, **आक्रमक आव्हान - लोकतांत्रिक प्रत्युत्तर मिडीया**, **जून एप्रिल** 2009 **पान नंबर** 12

5) **डॉ.बी एल फालीया** "**अंतरराष्ट्रीय राजनीति**" **साहित्य भवन आग्रा पेज नंबर**-384

6) **दैनिक समाचार पत्र- हिंदुस्थान**3 **जानेवारी** 2016